# १. परिचय

व्हीआयपीएल, ह्या रिलायन्स पॉवर लिमिटेडच्या एक स्पेशल पर्पज वेहिकलने (एसपीव्ही), महाराष्ट्रातील नागपूरमधील बुटिबोरी येथे ६०० मेगावॅटचे (म्हणजेच प्रत्येकी २*३०० मेवॅ) औष्णिक निर्मिती केंद्र उभारलेले आहे. व्हीआयपीएल रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड – डिस्ट्रिब्युशन (यानंतर आरइन्फ्रा–डी असा उल्लेख) यांनी, त्यांच्या परवानाप्राप्त क्षेत्रातील ग्राहकांच्या ऊर्जेची गरज भागविण्यासाठी या वीजकेंद्रापासून संपूर्ण ६०० मेवॅ ऊर्जेचे प्रापण करण्यासाठी पीपीए हस्ताक्षरित केलेले आहे.

आयोगाने दिनांक ५ जानेवारी २०१५ रोजीच्या आदेशान्वये, ह्या आदेशाच्या दिनांकापासून, अल्टरनेटिव्ह २ अंतर्गत आणि २००६मध्ये सुधारित केलेल्या मविनिआ (पारेषण परवाना अटी) नियमावली, २००४ अनुसार व्हीआयपीएलला २५ वर्षांच्या कालावधीसाठी पारेषण परवाना दिलेला आहे.

## १.१ मध्यावधी पुनरावलोकन दरपत्रक (एमटीआर) याचिका सादर करण्याची पार्श्वभूमी

एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ५.१(बी) मध्ये आ.व. १५–१६ आणि आ.व. १६–१७ साठी अचूक समायोजन, आ.व. १७–१८साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी सुधारित एआरआरचे भाकीत यांविषयी तरतूद केलेली आहे. सदर विनियमानुसार आ.व. १५–१६साठीचे अचूक समायोजन एमवायटी नियमावली, २०११ नुसार केले जाते आणि त्यानंतर आ.व. १६–१७ साठी अचूक समायोजन, आ.व. १७–१८साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी सुधारित एआरआरचे भाकीत यांसाठी एमवायटी नियमावली, २०१५ लागू होईल.

## १.२ एमटिआर याचिकेचे उद्दिष्ट

सध्याची सुधारित मध्यावधी पुनरावलोकन याचिका व्हीआयपीएल–टी द्वारे एमवायटी नियमावली, २०११ मधील तरतुदींच्या अंतर्गत आ.व. १५–१६चे अचूक समायोजन; एमवायटी नियमावली, २०१५ मधील तरतुदींच्या अंतर्गत आ.व. १६–१७चे अचूक समायोजन, आ.व. १७–१८चे तात्पुरते अचूक समायोजन आणि आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२०साठी एकत्रित महसुलाची सुधारित आवश्यकता यासाठी मान्यता मिळविण्यासाठी दाखल करण्यात येत आहे.

## २. व्हीआयपीएल–टीच्या पारेषण प्रणालीवर दृष्टिक्षेप

### २.१ व्हीआयपीएल–पारेषण

याचिकाकर्ते, व्हीआयपीएल–टी यांनी युनिट–१ आणि युनिट–२साठी स्वतंत्रपणे विद्युत निर्वासन व्यवस्था उभारली आहे. व्हीआयपीएलच्या पारेषण नेटवर्कचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

**तक्ता १: व्हीआयपीएल–टी प्रणाली – सध्याची स्थिती**

| तपशील | मापन एकक | मूल्य |
|---|---|---|
| २२० केव्ही वाहिनीची एकूण लांबी | सर्किट किमी | ६.१२ |
| २२० केव्ही बेज्ची एकूण संख्या | नग | ४ |

### २.२ पारेषण वाहिनी उपलब्धता

एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ६० आणि एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ५७ मध्ये, वार्षिक पारेषण आकारांच्या वसुलीसाठी एसी प्रणालीची किमान उपलब्धता ९८% एवढी नमूद केलेली आहे. व्हीआयपीएल–टी कडे एसी पारेषण प्रणाली आहे आणि आ.व. २०१५–१६ आणि २०१६–१७साठीची व्हीआयपीएल–टी प्रणालीची उपब्धता अनुक्रमे ९९.८७% आणि ९९.८६% एवढी राहिलेली आहे, जी नमुनेदार किमान उपलब्धतेपेक्षा बरीच अधिक आहे.

## ३. भांडवलासाठी खर्च

### ३.१ व्हीआयपीएल–पारेषण–भांडवलासाठीच्या खर्चाची पार्श्वभूमी

२०१५च्या प्रकरण ३६मध्ये व्हीआयपीएलने केलेल्या सादरीकरणावर आधारित, माननीय आयोगाने आ.व. २०१४–१५ आणि आ.व. २०१५–१६ साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता निश्चित करण्यासाठी रु.२७.२२ कोटी एवढ्या भांडवलासाठीचा खर्च आणि भांडवली करणाला तात्पुरती मान्यता दिली होती. माननीय आयोगाने दिनांक १० मार्च २०१७च्या कार्यादिशाद्वारे, व्हीआयपीएलच्या पारेषण मत्तांची मत्तापडताळणी करण्यासाठी मेसर्स आर्कट्यूरस बिझिनेस सोल्युशन्स एलएलपी यांची स्वतंत्र तज्ज्ञ/संस्था म्हणून नेमणूक केली होती.

माननीय आयोगाने दिनांक २० मार्च २०१७च्या पत्र क्र. MERC/TPAV/TOR/0170 अनुसार दिलेल्या निर्देशानुसार व्हीआयपीएलने संबंधित तपशील आणि दस्तऐवज मत्तापडताळणीसाठी माननीय आयोगाकडे सादर केले होते.

माननीय आयोगाने, व्हीआयपीएलचे त्यावरील भाष्य मागविण्यासाठी दिनांक २ नोव्हेंबर २०१७च्या पत्र क्र. MERC/Third Party Asset Verification/4855 द्वारे सल्लागार मेसर्स आर्कट्यूरस बिझिनेस सोल्युशन्स एलएलपी यांनी सादर केलेला तृतीय पक्षीय पडताळणी अहवालाची प्रत रवाना केली होती.

## ४. आ.व. १५–१६साठी अचूक समायोजन

या याचिकेत व्हीआयपीएल–टी आ.व. १५–१६साठी महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न यांची वास्तविक आकडेवारी, लेखापरीक्षित हिशेबांच्या आधारे अचूक समायोजनासाठी सादर करीत आहे.

### ४.१ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण क्र. २१मध्ये मान्यता दिल्यानुसारचे प्रचालन आणि देखभाल खर्च आणि आ.व. १५–१६साठीचे वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च यांचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता २: आ.व. १५–१६साठीचा वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| प्रचालन आणि देखभाल खर्च | **०.६९** | ०.५० | ०.२० |

मान्यता दिलेला रु.०.६९ कोटी एवढ्या नमुनेदाखलच्या प्रचालन आणि देखभाल खर्चाची तुलना रु.०.५० कोटी एवढ्या वास्तविक खर्चाशी करता, परिणामस्वरूपी रु.०.२० कोटी एवढ्या नियंत्रणयोग्य कार्यक्षता लाभ होतो, ज्यापैकी रु.०.१३ कोटी एवढ्या रकमेचा दावा एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेत करण्यात आलेला आहे. म्हणून प्रचालन आणि देखभाल खर्चासाठीची निव्वळ पात्रता रु.०.६३ कोटी एवढी आहे. माननीय आयोगाला विनंती आहे की त्यांनी व्हीआयपीएल–टीने दावा केलेल्या प्रचालन आणि देखभाल खर्चाला मान्यता द्यावी.

### ४.२ घसारा

आ.व. १५–१६साठीच्या घसाऱ्याचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

**तक्ता ३: आ.व. १५–१६ साठीचा घसारा**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| घसारा | १.४१ | १.४१ | ०.०० |

### ४.३ भांडवली कर्जावरील व्याज

आ.व. १५–१६साठी नमुनेदार सरासरी कर्जाच्या शिल्लक रकमेवर दिनांक १ एप्रिल २०१५ रोजी असलेला ११.६५% एवढा व्याजदर लागू करून भांडवली कर्जावरील व्याजाची गणना केलेली आहे.

**तक्ता ४: आ.व. १५–१६ साठीचे भांडवली कर्जावरील व्याज**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | २.१२ | १.९७ | ०.१४ |

## ४.४ समभाग भांडवलावरील परतावा

समभाग भांडवलावरील परतावा (आरओई) हा एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३२.२वर आधारित, म्हणजेच १५.५% दराने गणला गेला आहे आणि माननीय आयोगाला विनंती आहे की त्याला मान्यता देण्यात यावी.

**तक्ता ५: समभाग भांडवलावरील परतावा आ.व. १५–१६**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| **समभाग भांडवलावरील एकूण परतावा** | १.२७ | १.२७ | ०.०० |

## ४.५ खेळत्या भांडवलावरील व्याज

खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेचे हिशेब, एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३५.२ नुसार, वास्तविक आकडेवारीचे मापदंड लावून केलेला आहे.

**तक्त ६: खेळत्या भांडवलावरील व्याज आ.व. १५–१६**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ०.१२ | ० | ०.१२ |

परिणामस्वरूपीचा रु.०.१२ कोटी एवढा लाभ वाटून घेतलेला आहे. एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम १४.१ मध्ये नियंत्रणयोग्य घटकांमुळे झालेला लाभ वाटून घेण्यासाठीच्या यंत्रणेची तरतूद आहे. अशा प्रकारे सदर विनियमाच्या अनुषंगाने २/३ लाभ, म्हणजेच रु.०.०८ कोटी एवढ्या रकमेचा दावा एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेत करण्यात आलेला आहे. म्हणून आयडब्ल्यूसीमधील व्हीआयपीएल–टीची निव्वळ पात्रता रु.०.०८ कोटी एवढी आहे.

## ४.६ आयकर

आ.व. १५–१६मध्ये महसुलाची कोणतीही वसुली सुरू झालेली नसल्याने माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण २१मध्ये दिलेल्या एमवायटी आदेशात आ.व. १५–१६ साठी कोणतेही उत्पन्न विचारात घेतलेले नाही. परंतु नियंत्रित पीबीटी दृष्टिकोन वापरून गणना करण्यात आलेला आयकर व्हीआयपीएल–टीद्वारे विचारात घेण्यात आलेला आहे.

**तक्ता ७: आयकर आ.व. १५–१६**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| आयकर | – | ०.२९ | ०.२९ |

## ४.७ आकस्मिक आरक्षितांसाठी वर्गणी

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण २१मध्ये आकस्मिक आरक्षितासाठीची वर्गणी म्हणून आ.व. २०१५–१६साठी रु.०.०७ कोटी एवढ्या रकमेला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार, व्हीआयपीएलने आ.व. २०१५–१६साठी रु.०.०७ कोटी एवढी आकस्मिक आरक्षितासाठीची वर्गणी निर्माण केलेली आहे.

**तक्ता ८: आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी आ.व. १५–१६**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी | ०.०७ | ०.०७ | ०.०० |

## ४.८ आ.व. १५–१६साठी महसूल

### ४.८.१ आंतरराज्य पारेषण प्रणालीपासून महसूल

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण ९१मध्ये दिनांक २२ जुलै २०१६ रोजी आंतरराज्य पारेषण प्रणालीसाठीच्या पारेषण दरांसाठी दिलेल्या आदेशात आ.व. २०१६–१७ साठी जुलै २०१६ पासून पुढे आ.व. १५–१६ साठी एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेची वसुली करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार व्हीआयपीएल–टी यांनी २०१५–१६साठी एकूण महसूल हा १२ महिन्यांऐवजी फक्त नऊ महिन्यांच्या कालावधीसाठी बिल केलेला आहे. म्हणून या दरपत्रकासाठीची याचिका व्हीआयपीएल–टी मध्ये , माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण ९१मध्ये दिनांक २२ जुलै २०१६ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार आ.व. २०१५–१६च्या तीन महिन्यांसाठी रु.१.४२ कोटी एवढ्या रकमेची वसुली अपेक्षिलेली आहे.

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण क्र. २१मध्ये १० जून २०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या आणि २०१६च्या प्रकरण क्र. ९१मध्ये आ.व. २०१६–१७ ते आ.व. २०१९–२० या तीन वर्षांच्या नियंत्रण कालावधीसाठी दिनांक २२ जुलै २०१६रोजी आंतरराज्य पारेषण प्रणालीसाठी पारेषण दरपत्रकासाठी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने व्हीआयपीएल–टीने आ.व. २०१५–१६साठी एकूण महसूल रु.४.२५ कोटी एवढा बिल केलेला आहे.

### ४.८.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, आ.व. २०१५–१६साठी पारेषण व्यवसायाचे दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न निरंक (शून्य) होते.

### ४.८.३ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, आ.व. २०१५–१६ दरम्यान त्यांनी इतर व्यवसायापासून कोणताही महसूल प्राप्त केलेला नाही.

### ४.८.४ व्हीआयपीएल–टी नेटवर्कवर उपलब्धता प्रोत्साहन

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, आ.व. २०१५–१६साठीची पारेषण प्रणाली उपलब्धता ९९.८७% आहे. विनियम ६०.१ आणि ६०.२ यांच्या संयुक्त वाचनानुसार, व्हीआयपीएल–टीने उपलब्धता ९९.७५% पर्यंत सीमित करून पारेषण उपलब्धतेवरील प्रोत्साहनाची गणना केलेली आहे. प्रोत्साहन निश्चित करण्यासाठी विचारात घेण्यात आलेले वार्षिक पारेषण आकार हे दरपत्रकाव्यतिरिक्तचे आणि इतर व्यवसायापासूचने उत्पन्न वजा जाता आहे. आ.व. १५–१६साठी प्रोत्साहनपर रक्कम रु.०.१० कोटी एवढी येते.

व्हीआयपीएल–टी माननीय आयोगाला विनंती करीत आहे की त्यांनी तिला मान्यता द्यावी.

## ४.९ आ.व. १५–१६साठी महसुली तफावत/अधिक्य

आ.व. १५–१६साठीच्या एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश खालील तक्त्यात दिलेला आहे:

**तक्त ९: आ.व. १५–१६साठी अचूक समायोजना सारांश**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | लाभ/(हानी)च्या विभागणीनंतर निव्वळ पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ०.६९ | ०.५० | ०.५० |
| २ | घसाऱ्यावरील खर्च | १.४१ | १.४१ | १.४१ |
| ३ | दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | २.१२ | १.९७ | १.९७ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील आणि सुरक्षा अनामत रकमेवरील व्याज | ०.१२ | – | – |
| ५ | आयकर | ०.०० | ०.२९ | ०.२९ |
| ६ | आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी | ०.०७ | ०.०७ | ०.०७ |
| ७ | एकूण महसुली खर्च | ४.४१ | ४.२४ | ४.२४ |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | १.२७ | १.२७ | १.२७ |
| **९** | **एकूण महसुलाची आवश्यकता** | **५.६७** | **५.५१** | **५.५१** |
| १० | अधिक: व्हीआयपीएलने प्रचालन आणि देखभाल खर्चांमध्ये राखावयाचा २/३ कार्यक्षमता लाभ/(हानी) (नियंत्रणयोग्य घटकांमुळे) | | | ०.१३ |
| ११ | अधिक: व्हीआयपीएलने खेळत्या भांडवलामध्ये राखावयाची २/३ कार्यक्षमता लाभ/(हानी) (नियंत्रणयोग्य घटकांमुळे) | | | ०.०८ |
| १२ | वजा: इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | | – | – |

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | लाभ/(हानी)च्या विभागणीनंतर निव्वळ पात्रता |
|---|---|---|---|---|
| **१३** | **पारेषण दरांपासून आवश्यक असलेला एकत्रित महसूल** | | | **५.७१** |
| १४ | पारेषण दरापासूनचा महसूल | | **४.२५** | **४.२५** |
| १५ | अधिक: आ.व. २०१५–१६साठी उपलब्धता प्रोत्साहन | | | ०.१० |
| **१६** | **महसुली तफावत/(अधिक्य)** | | | **१.५६** |

आ.व. १५–१६ साठी याचिकार्त्यांनी अपेक्षिलेली महसुली तफावत माननीय आयोगाने मान्य करावी अशी याचिकाकर्ते विनंती करीत आहेत.

## ५. आ.व. १६–१७ साठी अचूक समायोजन

या याचिकेत व्हीआयपीएल–टी अचूक समायोजनासाठी लेखापरीक्षित हिशेबांच्या आधारे आ.व. १६–१७ साठी महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न यांच्या बाबतीतली वास्तविक आकडेवारी सादर करीत आहे.

### ५.१ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

#### ५.१.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड

२०१६च्या प्रकरण २१मध्ये माननीय आयोगाने दिलेल्या आदेशामध्ये मान्यता दिलेले प्रचालन आणि देखभाल खर्च आ.व. १६–१७मध्ये केलेले वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च यांचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता १०: वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च आ.व. १६–१७**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| प्रचालन आणि देखभाल खर्च | **०.७३** | ०.४८ | ०.२४ |

मान्यता दिलेले नमुनेदार प्रचालन आणि देखभाल खर्च रु.०.७३ कोटीची तुलना रु.०.४८ कोटी एवढ्या वास्तविक खर्चाशी केली जावी, परिणामस्वरूपी नियंत्रणयोग्य कार्यक्षमता लाभ रु.०.२४ कोटी एवढी असेल.

पैकी रु.०.०८ कोटी एवढी रक्कम प्रचालन आणि देखभाल खर्चातील कार्यक्षमता लाभ म्हणून एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेत दावा करण्यात आलेली आहे. म्हणून प्रचालन आणि देखभाल खर्चातील निव्वळ पात्रता रु. ०.५६ कोटी आहे.

माननीय आयोगाला विनंती करण्यात येते की, त्यांनी आ.व. १६–१७साठी प्रचालन आणि देखभाल खर्चाला, कार्यक्षमता लाभांसह मान्यता द्यावी.

### ५.२ घसारा

आ.व. १६–१७साठीच्या घसाऱ्याचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

**तक्ता ११: आ.व.१६–१७ साठीचा घसारा**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| घसारा | १.४१ | १.४१ | ०.०० |

#### ५.२.१ भांडवली कर्जावरील व्याज

व्हीआयपीएलचे म्हणणे आहे की, दीर्घकालीन कर्जावरील व्याजाची गणना एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २९.५ वर आधारित केलेली आहे.

भांडवली कर्जावरील व्याजाची गणना ११.७७% व्याजदर लावून केलेली आहे, जो आ.व. १६–१७साठी नमुनेदार सरासरी कर्जाच्या शिल्लक रकमेवर १ एप्रिल २०१६पासून लागू करण्यात आला होता.

**तक्ता १२: भांडवली कर्जावरील व्याज आ.व. १६–१७**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| दीर्घ–अवधि कर्जावरील व्याज | १.८४ | १.८३ | ०.०१ |

### ५.२.२ समभाग भांडवलावरील परतावा

व्हीआयपीएलचे म्हणणे आहे की, समभाग भांडवलावरील परताव्याची (आरओई) गणना एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २८वर आधारित, म्हणजेच १५.५% दराने केलेली आहे.

**तक्ता १३: समभाग भांडवलावरील परतावा आ.व. १६–१७**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| **समभाग भांडवलावरील परतावा** | १.२७ | १.२७ | ०.०० |

### ५.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

खेळत्या भांडवलाची आवश्यकता एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ३१.२ अनुसार, वास्तविक आकडेवारीला मापदंड लावून गणली आहे.

**तक्ता १४: खेळत्या भांडवलावरील व्याज आ.व. १६–१७**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ०.१२१ | ० | ०.१२ |

### ५.३.१ खेळत्या भांडवलावरील लाभ/हानी विभागून घेणे

परिणामस्वरूपी नियंत्रणयोग्य रु.०.१२ एवढा लाभ विभागून घेतलेला आहे. एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ११मध्ये नियंत्रणयोग्य घटकांमुळे झालेला लाभ विभागून घेण्यासाठीच्या यंत्रणेची तरतूद आहे. अशा प्रकारे सदर विनियमयाच्या अनुषंगाने १/३ लाभ, म्हणजेच रु.०.०४ कोटी एवढी रक्कम एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेत दावा करण्यात आलेली आहे. म्हणून आयसीडब्ल्यूमध्ये व्हीआयपीएल–टी ची निव्वळ पात्रता रु.०.०४ कोटी एवढी आहे.

### ५.४ आयकर

दरपत्रक विनियम, २०१५मध्ये व्याख्या दिल्यानुसार आयकर नियंत्रित पीबीटी दृष्टिकोनानुसार गणला गेला आहे.

**तक्ता १५: आ.व. १६–१७ साठीचा आयकर**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| आयकर | ०.८७ | ०.३१ | ०.५६ |

## ५.५ आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण २१मध्ये आकस्मिक आरक्षितासाठीची वर्गणी म्हणून आ.व. २०१६–१७साठी रु.०.०७ कोटी एवढ्या रकमेला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार, व्हीआयपीएलने आ.व. २०१६–१७साठी रु.०.०७ कोटी एवढी आकस्मिक आरक्षितासाठीची वर्गणी निर्माण केलेली आहे.

**तक्ता १६: आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी आ.व. १६–१७**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | फरक |
|---|---|---|---|
| आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी | ०.०७ | ०.०७ | ०.०० |

## ५.६ आ.व. १६–१७साठी महसूल

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण ९१मध्ये दिनांक २२ जुलै २०१६ रोजी आंतरराज्य पारेषण प्रणालीसाठीच्या पारेषण दरांसाठी दिलेल्या आदेशात आ.व. २०१६–१७साठी असलेल्या एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेची वसुली आ.व. १६–१७पासून करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार व्हीआयपीएल–टी यांनी आ.व. २०१६–१७साठी एकूण महसूल हा १२ महिन्यांऐवजी फक्त नऊ महिन्यांच्या कालावधीसाठी बिल केलेला आहे. म्हणून या दरपत्रकासाठीच्या याचिकेत, माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण ९१मध्ये दिनांक २२ जुलै २०१६ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार आ.व. २०१६–१७च्या तीन महिन्यांसाठी रु.१.५७ कोटी एवढ्या रकमेची वसुली अपेक्षिलेली आहे.

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण क्र. २१मध्ये १० जून २०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या आणि २०१६च्या प्रकरण क्र. ९१मध्ये आणि २०१६च्या प्रकरण ९१मध्ये दिनांक २२ जुलै २०१६रोजी आंतरराज्य पारेषण प्रणालीसाठी पारेषण दरपत्रकासाठी आ.व. २०१६–१७ ते आ.व. २०१९–२० या तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने व्हीआयपीएल–टीने आ.व. २०१५–१६साठी एकूण महसूल रु.४.७२ कोटी एवढा बिल केलेला आहे.

### ५.६.१ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, आ.व. २०१६–१७साठी पारेषण व्यवसायाचे दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न निरंक (शून्य) होते.

### ५.६.२ इतर व्यवसायापासून उत्पन्न

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, आ.व. १६–१७ दरम्यान त्यांनी इतर व्यवसायापासून कोणताही महसूल प्राप्त केलेला नाही.

### ५.६.३ व्हीआयपीएल–टीच्या उपलब्धतेवर प्रोत्साहन

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, आ.व. २०१६–१७साठीची पारेषण प्रणाली उपलब्धता ९९.८६% आहे. विनियम ५७.१ आणि ५७.२ यांच्या संयुक्त वाचनानुसार, व्हीआयपीएल–टीने उपलब्धता ९९.७५% पर्यंत सीमित करून पारेषण उपलब्धतेवरील प्रोत्साहनाची गणना केलेली आहे. प्रोत्साहन निश्चित करण्यासाठी विचारात घेण्यात आलेले वार्षिक पारेषण आकार हे दरपत्रकाव्यतिरिक्तचे आणि इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न वजा जाता आहे. आ.व. १६–१७साठी प्रोत्साहनपर रक्कम रु.०.०४ कोटी एवढी येते.

व्हीआयपीएल–टी माननीय आयोगाला विनंती करीत आहे की त्यांनी तिला मान्यता द्यावी.

## ५.७ आ.व. १६–१७साठी महसुली तफावत/अधिक्य

आ.व. १६–१७साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता खालील तक्त्यात दिलेली आहे:

**तक्ता १७: आ.व. १६–१७ साठी समायोजन सारांश**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | लाभ/(हानी)च्या विभागणीनंतर निव्वळ पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ०.७३ | ०.४८ | ०.४८ |
| २ | घसाऱ्यावरील खर्च | १.४१ | १.४१ | १.४१ |
| ३ | दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | १.८४ | १.८३ | १.८३ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील आणि सुरक्षा अनामत रकमेवरील व्याज | ०.१२१ | – | – |
| ५ | आयकर | ०.८७ | ०.३१ | ०.३१ |
| ६ | आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी | ०.०७ | ०.०७ | ०.०७ |
| ७ | एकूण महसुली खर्च | ५.०४ | ४.१० | ४.१० |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | १.२७ | १.२७ | १.२७ |
| **९** | **एकूण महसुलाची आवश्यकता** | **६.३०** | **५.३७** | **५.३७** |
| १० | अधिक: व्हीआयपीएलने प्रचालन आणि देखभाल खर्चांमध्ये राखावयाचा १/३ कार्यक्षमता लाभ/(हानी) (नियंत्रणयोग्य घटकांमुळे) | | | ०.०८ |
| ११ | अधिक: व्हीआयपीएलने खेळत्या भांडवलामध्ये राखावयाची १/३ कार्यक्षमता लाभ/(हानी) (नियंत्रणयोग्य घटकांमुळे) | | | ०.०४ |
| १२ | वजा: इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | ०.०१ | – | – |

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | वास्तविक | लाभ/(हानी)च्या विभागणीनंतर निव्वळ पात्रता |
|---|---|---|---|---|
| **१३** | **पारेषण दरांपासून आवश्यक असलेला एकत्रित महसूल** | **६.२९** | **५.३७** | **५.४९** |
| १४ | पारेषण दरापासूनचा महसूल | | ४.७२ | ४.७२ |
| १५ | अधिक: आ.व. २०१६–१७साठी उपलब्धता प्रोत्साहन | | | ०.०४ |
| **१६** | **महसुली तफावत/(अधिक्य)** | | | **०.८१** |

माननीय आयोगाला विनंती करण्यात येते की, वास्तविक खर्च आणि महसुलाला मान्यता देण्यात यावी आणि आ.व. २०१६–१७च्या अचूक समायोजनासाठी ते विचारात घ्यावेत.

## ६. आ.व. १७–१८साठी तात्पुरते अचूक समायोजन

या विभागात, व्हीआयपीएल–टी आ.व. १७–१८साठी, पहिल्या सहामाहीच्या (एच१) अलेखापरीक्षित वास्तविक आकडेवारीवर आरि दुसऱ्या सहामाहीच्या (एच२) अंदाजित आकडेवारीवर आधारित तात्पुरते खर्च सादर करीत आहे.

### ६.१ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

माननीय आयोगाने त्यांच्या २०१६मधील प्रकरण २१मध्ये दिलेल्या आदेशान्वये आ.व. १७–१८साठी रु.०.७६ कोटी एवढ्या नमुनेदाखल प्रचालन आणि देखभाल खर्चाला मान्यता दिलेली आहे.

**तक्ता १८: मापदंडांनुसार प्रचालन आणि देखभाल खर्च आ.व. १७–१८**

| मापदंडांनुसार प्रचालन आणि देखभाल खर्च (कोटी रु.) | आ.व. १७–१८ |
|---|---|
| सर्किट किमी बेसिस | ०.०२ |
| बेज्ची संख्या | ०.७५ |
| **एकूण** | **०.७६** |

आ.व. १७–१८साठीच्या रु.०.७६ कोटी एवढ्या नमुनेदार प्रचालन आणि देखभाल खर्चासाठी मान्यता द्यावी ही विनंती.

### ६.२ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, आ.व. २०१७–१८ दरम्यान कोणतेही भांडवली खर्च अपेक्षित नाहीएत.

#### ६.२.१ घसारा

**घसाऱ्यासाठीचा सारांश खालील तक्त्यात दिलेला आहे:**

**तक्ता १९: घसारा आ.व. १७–१८**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|
| घसारा | १.४१ | १.४१ | ० |

#### ६.२.२ भांडवली कर्जावरील व्याज

व्हीआयपीएलचे म्हणणे आहे की, दीर्घकालीन कर्जावरील व्याज हे एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २९.५वर आधारित गणले गेले आहे.

भांडवली कर्जावरील व्याज ११.३०% दराने गणले आहे, जो दर आ.व. १७–१८साठी १ एप्रिल २०१७ रोजी नमुनेदार सरासरी शिल्लक कर्जावर लागू होता.

**तक्ता २०: दीर्घकालनीन भांडवली कर्जावरील व्याज आ.व. १७–१८**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|
| दीर्घकालनीन भांडवली कर्जावरील व्याज | १.६७ | १.६० | (०.०७८) |

### ६.२.३ समभाग भांडवलावरील परतावा

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, समभाग भांडवलावरील परताव्याची गणणा एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २८ वर आधारित, वर्षाच्या सुरुवातील समभाग भांडवलावर १५.५% दराने अधिक वर्षभरात भांडवलीकरण केलेल्या मत्तांच्या ५०% हिश्श्यावर १५.५% या दराने केली गेली आहे.

**तक्ता २१: समभाग भांडवलावरील परतावा आ.व. १७–१८**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|
| **समभाग भांडवलावरील एकूण परतावा** | **१.२७** | **१.२७** | **०.००** |

### ६.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

आ.व. २०१७–१८साठीची खेळत्या भांडवलाची आवश्यकता एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ३१.२ वर आधारित केली गेली आहे, ती खालीलप्रमाणे आहे. हा व्याजदर व्हीआयपीएलचा वास्तविक व्याजदर म्हणून विचारात घेतलेला आहे.

**तक्त २२: खेळत्या भांडवलावरील व्याज आ.व. १७–१८**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ०.११ | ०.१० | (०.०१) |

### ६.४ आयकर

आ.व. २०१७–१८साठी २१.३४% एवढ्या एमएटी दराने समभाग भांडवलावरील परतावा एकत्र करून (ग्रॉसिंग अप) आयकराची गणना केलेली आहे.

**तक्ता २३: आयकर १७–१८**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|
| आयकर | ०.३४ | ०.३१ | (०.०३) |

### ६.५ आकस्मिकता आरक्षितासाठी वर्गणी

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण क्र. २१मध्ये दिलेल्या आदेशात आ.व. २०१७–१८साठी रु.०.०७ कोटी एवढ्या आकस्मिकता आरक्षितासाठी वर्गणीला मान्यता दिलेली आहे.

**तक्ता २४: आकस्मिकता आरक्षितासाठी वर्गणी आ.व. १७–१८**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|
| आकस्मिकता आरक्षितासाठी वर्गणी | ०.०७ | ०.०७ | – |

## ६.६ आ.व. १७–१८साठी महसूल

### ६.६.१ आंतरराज्य प्रणालीपासून महसूल

माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण क्र.२१मध्ये दिनांक १० जून २०१६ रोजी आ.व. २०१४–१५साठीचे अचूक समायोजन, आ.व. २०१५–१६साठीचे तात्पुरते अचूक समायोजन आणि आ.व. २०१६–१७ ते आ.व. २०१९–२० साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता यांसाठी दिलेल्या आदेशात आणि २०१६च्या प्रकरण क्र. ९१मध्ये दिनांक २२ जुलै २०१६रोजी आ.व. २०१६–१७ ते आ.व. २०१९–२० या तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठीच्या आंतरराज्य पारेषण प्रणालीच्या पारेषण दरांसाठी दिलेल्या आदेशात आ.व. २०१७–१८साठी व्हीआयपीएल–टीसाठी एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेला मान्यता दिलेली आहे.

### ६.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आ.व. १७–१८साठी दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न हे माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण क्र. २१मध्ये दिलेल्या एमवायटी आदेशाएवढे विचारात घेतलेले आहे.

**तक्ता २५: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आ.व. १७–१८**

| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|
| दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | ०.०२ | ०.०२ | – |

### ६.६.३ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, त्यांचे विद्युतनिर्मिती व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसायांपासून कोणतेही उत्पन्न नाही.

## ६.७ आ.व. १७–१८साठी तात्पुरती महसुली तफावत/अधिक्य

आ.व. १७–१८साठी एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश खालील तक्त्यात दिलेला आहे:

**तक्ता २६: आ.व. १७–१८साठी तात्पुरती तफावत/अधिक्य**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ०.७६ | ०.५० | – |
| २ | घसाऱ्यावरील खर्च | १.४१ | १.४१ | – |
| ३ | दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | १.६७ | १.६० | (०.०७८) |

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | भाकीत | फरक |
|---|---|---|---|---|
| ४ | खेळत्या भांडवलावरील आणि सुरक्षा अनामत रकमेवरील व्याज | ०.११ | ०.१० | – |
| ५ | आयकर | ०.३४ | ०.३१ | (०.०३) |
| ६ | आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी | ०.०७ | ०.०७ | – |
| **७** | **एकूण महसुली खर्च** | **४.३७** | **३.९९** | **(०.३७)** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | १.२७ | १.२७ | – |
| **९** | **एकूण महसुलाची आवश्यकता** | **५.६४** | **५.२६** | **–** |
| १० | वजा: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | ०.०२ | ०.०२ | – |
| **११** | **पारेषण दरांपासून आवश्यक असलेला एकत्रित महसूल** | **५.६२** | **५.२५** | |
| **१२** | **पारेषण दरापासूनचा महसूल** | | **५.६४** | |
| **१३** | **महसुली तफावत/(अधिक्य)** | | **(०.३९)** | |

माननीय आयोगाला आ.व. २०१७–१८साठी महसुली तफावत मान्य करण्याची विनंती करण्यात येत आहे.

## ७. आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२०साठी सुधारित एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेचे भाकीत

या याचिकेत एमवायटी नियमावली, २०१५मधील संबंधित विनियमातील तरतुदींनुसार व्हीआयपीएल–टी आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेचे सुधारित भाकीत सादर करीत आहे.

### ७.१ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ५८.७ मध्ये नवीन पारेषण वाहिन्यांसाठी आ.व. २०१८–१९ आणि आ.व. २०१९–२० या तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी प्रचालन आणि देखभाल खर्चासाठी वर्षनिहाय मापदंडांची तरतूद आहे.

**तक्ता २७: मापदंडांनुसार प्रचालन आणि देखभाल खर्च**

| मापदंडांनुसार प्रचालन आणि देखभाल खर्च (कोटी रु.) | आ.व. १८–१९ | आ.व. १९–२० |
|---|---|---|
| सर्किट किमीच्या आधारे | ०.०२ | ०.०२ |
| बेजच्या संख्येच्या आधारे | ०.७८ | ०.८२ |
| **एकूण** | **०.८०** | **०.८४** |

### ७.२ भांडवल गुंतवणूक योजना

आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी व्हीआयपीएल–टीने कोणतीही भांडवली योजना अपेक्षिलेली नाही.

#### ७.२.१ घसारा

आ.व. १८–१९ आणि आ.व. २०१९–२० साठी घसाऱ्याचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

**तक्ता २८: भाकीत घसारा**

| तपशील (कोटी रु.) | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| घसारा | १.४१ | १.४१ | १.४१ | १.४१ |

#### ७.२.२ भांडवली कर्जावरील व्याज

एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेवर आकारण्यायोग्य व्याज खालील तक्त्यात दर्शविलेले आहे:

**तक्ता २९: भांडवली कर्जावरील व्याजाचे भाकीत**

| तपशील (कोटी रु.) | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| दीर्घकालीन भांडवलावरील व्याज | १.५० | १.४४ | १.३४ | १.२८ |

### ७.२.३ समभाग भांडवलावरील परतावा

नियंत्रण कालावधीपैकी आ.व. २०१८–१९ आणि आ.व. २०१९–२० साठी इक्विटीवरील परतावा, एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २८ वर आधारित, म्हणजेच वर्षाच्या सुरुवातीला समभाग भांडवलावर १५.५% दराने अधिक वर्षाच्या दरम्यान भांडवलीकरण करण्यात आलेल्या मालमत्तांसाठी ५०% इक्विटी हिश्श्यावर १५.५% गणण्यात आलेला आहे.

**तक्ता ३०: समभाग भांडवलावरील परताव्याचे भाकीत**

| तपशील (कोटी रु.) | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| **समभाग भांडवलावरील एकूण परतावा** | १.२७ | १.२७ | १.२७ | १.२७ |

### ७.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

तिसऱ्या नियंत्रण कालावधीपैकी आ.व. २०१८–१९ आणि आ.व. २०१९–२०साठी खेळत्या भांडवलाची आवश्यकता, एमवायटी नियमावली, २०१५च्या विनियम ३१.२ नुसार गणण्यात आलेली आहे.

**तक्ता ३१: खेळत्या भांडवलावरील व्याजाचे भाकीत**

| तपशील (कोटी रु.) | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ०.११ | ०.१७ | ०.११ | ०.११ |

### ७.४ आयकर

आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२०साठीच्या सुधारित भाकितासाठी व्हीआयपीएल–टीने माननीय आयोगाने एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या आयकराएवढी रक्कम विचारात घेतलेली आहे.

**तक्ता ३२: आयकराचे भाकीत**

| तपशील (कोटी रु.) | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| आयकर | ०.३४ | ०.३४ | ०.३४ | ०.३४ |

### ७.५ आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी

व्हीआयपीएल–टीने आकस्मिक आरक्षितासाठीच्या वर्गणी, नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजी स्थिर मत्तांच्या मूळ किमतीच्या ०.२५% विचारात घेतलेली आहे.

**तक्ता ३३: आकस्मिकता आरक्षित वर्गणीचे भाकीत**

| तपशील (कोटी रु.) | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी | ०.०७ | ०.०७ | ०.०७ | ०.०७ |

### ७.६ महसूल

#### ७.६.१ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी सुधारित भाकीत करण्यासाठी दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न हे माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण क्र. २१मध्ये दिलेल्या आदेशात मान्यता दिल्याएवढे विचारात घेतलेले आहे.

**तक्ता ३४: दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नाचे भाकीत**

| | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|
| तपशील (कोटी रु.) | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | ०.०२ | ०.०२ | ०.०३ | ०.०३ |

#### ७.६.२ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न

व्हीआयपीएल–टीचे म्हणणे आहे की, त्यांनी तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी इतर व्यवसायापासून कोणतेही उत्पन्न अपेक्षिलेले नाही.

## ७.७ आ.व. २०१४–१५, आ.व. २०१५–१६ आणि आ.व. २०१६–१७साठी महसुली तफावतीवरील (अधिक्यावरील) कॅरिंग कॉस्ट

याचिकेत सादर केलेल्या महसुली तफावतीवर कॅरिंग कॉस्टची गणना करण्यात आलेली आहे. व्हीआयपीएलने कॅरिंग कॉस्टची गणना करण्यासाठी व्याजदर हा खेळत्या भांडवलावरील व्याजदराएवढा विचारात घेतलेला आहे, जो खालील तक्त्यात दिलेला आहे:

**तक्ता ३५: आ.व. २०१४–१५, आ.व. २०१५–१६ आणि आ.व. २०१६–१७ साठी महसुली तफावतीवर/(अधिक्यावर)**

**कॅरिंग कॉस्ट**

| तपशील (कोटी रु.) | आ.व. २०१५–१६ | आ.व. २०१६–१७ | आ.व. २०१७–१८ |
|---|---|---|---|
| व्याजदर | १४.२९% | १०.७९% | १०.६७% |
| मुद्दल रकमेची आरंभीची शिल्लक | – | १.६७ | २.६६ |
| अधिक जोड | १.५६ | ०.८१ | – |
| मुद्दल रकमेची अखेरची शिल्लक | १.५६ | २.४८ | २.६६ |
| आरंभीच्या रकमेवर कॅरिंग कॉस्ट | – | ०.१८ | ०.१४ |
| जोडलेल्या रकमेवर कॅरिंग कॉस्ट | ०.११ | ०.०४ | – |
| **एकूण कॅरिंग कॉस्ट** | **०.११** | **०.२२** | **०.१४** |
| **कॅरिंग कॉस्टसहित एकूण** | | | **२.०४** |

## ७.८ वार्षिक महसुली आवश्यकतेचे सुधारित भाकीत आ.व. २०१८–१९ आणि आ.व. २०१९–२०

नियंत्रण कालावधीच्या आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० या प्रत्येक वर्षासाठी एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेचे भाकीत खालील तक्त्यात दर्शविलेले आहे:

**तक्ता ३६: आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | आगामी वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आ.व. २०१८–१९ | | आ.व. २०१९–२० | |
| | | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ०.८० | ०.८० | ०.८४ | ०.८४ |
| २ | घसाऱ्यावरील खर्च | १.४१ | १.४१ | १.४१ | १.४१ |
| ३ | दीर्घकालीन भांडवली कर्जावरील आणि ग्राहकांच्या सुरक्षा अनामत रकमेवरील व्याज | १.५० | १.४४ | १.३४ | १.२८ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ०.११ | ०.१७ | ०.११ | ०.११ |
| ५ | आयकर | ०.३४ | ०.३४ | ०.३४ | ०.३४ |

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | आगामी वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आ.व. २०१८–१९ | | आ.व. २०१९–२० | |
| | | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| ६ | आकस्मिक आरक्षितांसाठी वर्गणी | ०.०७ | ०.०७ | ०.०७ | ०.०७ |
| **७** | **एकूण महसुली खर्च** | **४.२४** | **४.२४** | **४.११** | **४.०५** |
| ८ | अधिक: समभाग भांडवलावरील परतावा | १.२७ | १.२७ | १.२७ | १.२७ |
| **९** | **एकूण एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **५.५१** | **५.५०** | **५.३८** | **५.३२** |
| १० | वजा: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | ०.०२ | ०.०२ | ०.०३ | ०.०३ |
| ११ | एकत्रित महसुलाची आवश्यकता | **५.४९** | **५.४९** | **५.३५** | **५.२९** |
| **१२** | **आ.व. १४–१५साठी महसुली तफावत/(अधिक्य)** | | **०.४५** | | |
| **१३** | **आ.व. १५–१६साठी महसुली तफावत/(अधिक्य)** | | **१.५६** | | |
| **१४** | **आ.व. १६–१७साठी महसुली तफावत/(अधिक्य)** | | **०.८१** | | |
| **१५** | **संकलित महसुली तफावतीवर कॅरिंग कॉस्ट** | | **२.०४** | | |
| **१६** | **पारेषणापासूनच्या एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **५.४९** | **१०.३४** | **५.३५** | **५.२९** |

माननीय आयोगाला विनंती करण्यात येते की, उपरोक्त रु.१०.३४ कोटी आणि आ.व. ५.२९ कोटी एवढ्या अनुक्रमे आ.व. १८–१९ आणि आ.व १९–२० साठी सुधारित एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेला मान्यता द्यावी, जी नियंत्रण कालवधीच्या आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० या प्रत्येक वर्षासाठी पारेषण दरांमधून वसूल करावयाची आहे.